पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

दिनांक 20/12/2019 (शुक्रवार)

(दुपार)

---

## दुखापत

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि.मी. पेठबुधवार, काटोल येथे दिनांक 16/12/2019 चे 07:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजेन्द्र जंगलूजी सावरकर, रा. पेठबुधवार, काटोल हे भावाच्या घरी गेले असता फिर्यादीच्या भावाचे व आरोपी नामे– वसीम शहा, रा. पेठबुधवार काटोल या दोघांचे तोंडातोंडी वाद चालु होते. दरम्यान फियादीने आरोपीस समजविण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करून ढकलढूकल करून हातबुक्कयाने व काडीने मारहाण जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादी, फिर्यादीच्या भावाला व पत्नीला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 325 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक संतोष आंधळे हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. जलालखेडा :– दि. 18/12/2019 चे 12:30 वा. चे सुमारास 16 वर्षीय पीडित/फिर्यादी ही कॉलेजला जात असतांना आरोपी नामे– प्रमोद गजानन मानेकर, वय 24 वर्ष, रा. मेंढला, ता. नरखेड हा सतत 15 दिवासा पासुन पीडितेचा पाठलाग करीत होता. पीडित हि कॉलेज मधून बसने उतरुन घरी पायदळ जात असतांना आरोपीने पाठलाग करत पीडितेच्या घरापर्यंत आला. पीडिता घराचे कुलूप उघडत असतांना आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 506 भादंवि. सहकलम 8,12 बाल लैगिंक अत्याचार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि वानखेडे या करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील मौजा हरदोली पेपर मिल एन.एच.53 येथे दिनांक 11/12/2019 चे 18:00 वा. दरम्यान आरोपी नामे– सुरेश नत्थुजी इंगळे(मृतक), वय 34 वर्ष, रा. कारंजा (घा) जि.वर्धा ह.मु. सातनवरी हा त्याच्या एमएच–40/ईएक्स–4783 क्रमांकाच्या मोटरसायकलने दोडकी येथुन सातनवरी कडे जात असतांना त्याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविले. हरदोली पेपर मिल एनएच–53 रोडवर कुत्रा आडवा आल्याने आरोपीने जोराने ब्रेक मारल्याने मोटरसायकल सह रोडवर डोक्याचा भारावर पडला. आरोपीचे डोक्याला चेहऱ्याला जबर मार लागल्याने दिनांक 15/12/19 रोजी उपचारा दरम्यान मेडीकल कॉलेज नागपुर येथे त्याचा मृत्यू झाला. फिर्यादीचे चौकशी अहवाल व प्राप्त वैदयकीय कागदपत्रावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. ठाकरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर